# Insurance Agents (Life) Question Bank - Marathi

| Sr. No. | Question Body_Marathi | Alternative 1_Marathi | Alternative 2_Marathi | Alternative 3_Marathi | Alternative 4_Marathi | Correct Alternatives position |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | जुन्या काळात, चीनी व्यापारी धोकादायक पाण्यातून नेताना आपला माल वेगवेगळ्या जहाजांतून पाठवत असत. ह्याच्या कारणाचे विश्लेषण करा. | चिनी बोटी लहान होत्या आणि त्या जड माल घेऊन जात होत्या | व्यापाराचे समान वितरण व्हावे म्हणून अनेक शिपिंग कंपन्यांमध्ये मालाची विभागणी करावी असे चीन सरकारने आदेश दिले. | चिनी व्यापाऱ्यांनी त्यांचा माल एकाहून अधिक बोटींमध्ये ठेवला कारण त्यामुळे एकूण नुकसानीचा विमा मिळत असे. | चिनी व्यापाऱ्यांनी त्यांचा माल अनेक बोटींमध्ये ठेवला कारण ते स्वस्त होते | 3 |
| 2 | जोखमीची किंमत थेट प्रमाणात कशाशी निगडीत असते ? | नुकसानाची संभाव्यता आणि प्रभाव | केवळ नुकसानीचा परिणाम | नुकसानीची संभाव्यता आणि विम्याचे उद्दिष्ट | नुकसानाचा प्रभाव आणि विम्याचे उद्दिष्ट | 1 |
| 3 | खालीलपैकी कोणते विधान चुकीचे आहे? | परस्परांच्या सहकार्यांतर्गत, विविध व्यक्तींचे निधी एकत्र केले जातात | परस्परांच्या सहकार्यांतर्गत एकत्र येण्याला पुलिंग (एकत्रीकरण) असेही म्हणतात | परस्परांच्या सहकार्यांतर्गत आपल्याकडे निधीचा प्रवाह एका स्त्रोताकडून अनेकांकडे वाहतो. | परस्परांच्या सहकार्यांमुळे एखाद्याच्या अकाली मृत्यूमुळे होणाऱ्या आर्थिक नुकसानापासून संरक्षण मिळते. हा तोटा जीवन विमा करारामध्ये दाखल झालेल्या अनेकांच्या एकत्रित योगदान केलेल्या निधीद्वारे भरून काढला जातो. | 3 |

# Insurance Agents (Life) Question Bank - Marathi

| Sr. No. | Question Body_Marathi | Alternative 1_Marathi | Alternative 2_Marathi | Alternative 3_Marathi | Alternative 4_Marathi | Correct Alternatives position |
|---|---|---|---|---|---|---|
| 4 | आधुनिक विम्याचा सर्वात जुना प्रकार 14 व्या शतकात विशेषतः युरोपमधील ___________ मध्ये व्यावसायिक संघ किंवा सोसायट्यांच्या संरक्षणाच्या स्वरूपात होता. | स्पेन | फ्रान्स | जर्मनी | इटली | 4 |
| 5 | परम सद्भावाच्या उल्लंघनाच्या संदर्भात, खालीलपैकी कोणते बरोबर नाही | माहीती दडवणे हे हेतुपुरस्सर उघड न करणे आहे | लपविणे म्हणजे हेतूशिवाय उघड न करणे आहे | फसवणूक म्हणजे हेतुपुरस्सर मिथ्या निवेदन | एखाद्या रोगाचे अस्तित्व लपवणे हे हेतुपुरस्सर उघड न करणे आहे | 2 |
| 6 | अरिष्ट आणि धोका यातील फरक स्पष्ट करा. | अरिष्ट हे नुकसानाचे कारण आहे आणि हानी हा त्या नुकसानाचा परिणाम आहे | अरिष्ट हे नुकसानाचे थेट कारण आहे तर धोका हानीची संभाव्यता वाढवतो/कमी करतो | अरिष्ट हे नुकसानाचे थेट कारण आहे तर संकट हानीची संभाव्यता वाढवते/कमी करते | अरिष्ट नुकसानाची संभाव्यता आहे तर धोका हा नुकसानाच्या परिणामी धोक्याशी संबंधित आहे | 2 |
| 7 | IRDA ची स्थापना आयआरडीएआय कायदा, 1999 अंतर्गत ____________ साली करण्यात आली. | 1999 | 2000 | 2002 | 2003 | 2 |
| 8 | भूकंपामुळे होणारे नुकसान _______ आहे | गंभीर | सहयोगी | आनुषंगिक गोष्ट | सामान्य | 1 |

# Insurance Agents (Life) Question Bank - Marathi

| Sr. No. | Question Body_Marathi | Alternative 1_Marathi | Alternative 2_Marathi | Alternative 3_Marathi | Alternative 4_Marathi | Correct Alternatives position |
|---|---|---|---|---|---|---|
| 9 | आयुर्विमा पॉलिसींमध्ये अंतर्भूत केलेल्या, अ-विवाद-योग्य कलमाच्या अंतर्गत, कोण संरक्षित केले गेले आहे? | विमा-कर्ता | विमा-कृत | विमा प्रतिनिधी | विमा दलाल | 2 |
| 10 | खालील पैकी कोणाला, त्यांच्या व्यवसायामध्ये, अपघाताचा धोका असण्याची शक्यता आहे? सर्वाधिक योग्य पर्याय निवडा. | वैद्यकीय व्यावसायिक | पर्यटकांचा मार्गदर्शक | बांधकाम तोडण्यासंदर्भातील तज्ञ | विपणन कर्मचारी, जे नियमितपणे बाहेर काम करतात | 3 |
| 11 | खालील पैकी कोणाला, त्यांच्या व्यवसायामध्ये, आरोग्याचा धोका असण्याची शक्यता आहे? | योग-शिक्षक | चित्रपटातील थरारदृश्ये करणारे कलाकार | एका नाईट-क्लबमधील नर्तक | खाणीतील धुळीशी संपर्क येणारी व्यक्ती | 4 |
| 12 | विमा-कर्त्यांना महत्वपूर्ण माहिती का हवी असते? | दस्तऐवजीकरणाच्या हेतूंकरिता. | जोखीमेचा स्वीकार आणि संबंधित शर्ती व अटींविषयी निर्णय घेणे. | विनियामक आवश्यकतांचे पालन करणे. | ग्राहक-सेवा सुधारणे. | 2 |
| 13 | जुगार व विमा, यांची तुलना करा. | जुगार व विमा, दोनही, सारखेच आहेत. | जुगारामध्ये विमा-योग्य-हित नसते, मात्र विम्यामध्ये ते असते. | विम्याचे परिणाम केवळ नफादायक असतात, तर जुगारामुळे नुकसानही होऊ शकते. | जुगार कायद्याने लागू करता येतो; मात्र, विमा करता येत नाही. | 2 |
| 14 | एक अशी परिस्थिती निवडा, जी, परमसद्भावाचे तत्व दर्शविते. | विमा-हप्ता, वेळेवर भरणे. | एखाद्या विमा प्रस्ताव-प्रपत्रावर, सर्व महत्वाची माहिती, नमूद करणे. | एखाद्या विमा प्रस्ताव-प्रपत्रावर, सर्व महत्वाची माहिती, खोटी नमूद करणे. | विम्याच्या एका प्रस्ताव-प्रपत्रावर, असंबद्ध महिती नमूद करणे. | 2 |

| Insurance Agents (Life) Question Bank - Marathi | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Question Body_Marathi | Alternative 1_Marathi | Alternative 2_Marathi | Alternative 3_Marathi | Alternative 4_Marathi | Correct Alternatives position |
| 15 | अशा हिताचे नांव द्या, जे विमा-कृत व्यक्तीला, आयुर्विम्याच्या विषय-वस्तू मध्ये असते. सर्वाधिक योग्य पर्याय निवडा. | सट्टेबाजीचे हित | पैजेचे हित | विमायोग्य-हित | क्षति-पूर्ति हित | 3 |
| 16 | खाली नमूद केलेल्या अटींचे परीक्षण करा आणि फ्री लूक कालावधी दरम्यान पॉलिसी परत करण्यासाठी कोणती अट वैध नाही ते सांगा.<br>I: पॉलिसी दस्तऐवज प्राप्त झाल्यापासून 15 दिवसांच्या आत पर्यायाचा वापर करणे आवश्यक आहे<br>II: संवाद लिखित स्वरूपात असणे आवश्यक आहे<br>III: संवाद तोंडी किंवा लेखी असू शकतो. | फक्त I | फक्त II | फक्त III | I आणि III | 3 |

| Insurance Agents (Life) Question Bank - Marathi | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Question Body_Marathi | Alternative 1_Marathi | Alternative 2_Marathi | Alternative 3_Marathi | Alternative 4_Marathi | Correct Alternatives position |
| 17 | विमा कायद्याचे कलम ४५ (अ-विवाद-योग्य कलम), विमाकर्त्याने विमा-दावा फेटाळण्यापासून विमा-कृत व्यक्तिचे संरक्षण करते, जर पॉलिसीची --- पूर्ण झालेली असली पाहिजेत. सर्वाधिक योग्य पर्याय निवडा. | एक वर्ष | तीन वर्षे | पाच वर्षे | सात वर्षे | 2 |
| 18 | आत्महत्या कलमानुसार, जर, आत्महत्येमुळे, विमा-कृत व्यक्तीचा मृत्यु, पॉलिसी जारी केल्याच्या ३ वर्षांनंतर, झाल्यास, लाभार्थीला, विमा-दावा म्हणून काय मिळते? | कांहीही नाही. | विमा-कृत व्यक्तीने अदा केलेले विमा-हप्ते. | विमा-कृत व्यक्तीने अदा केलेले विमा-हप्ते × २. | पॉलिसीचे संपूर्ण दर्शनी-मूल्य. | 4 |
| 19 | पहिल्या हप्त्याची पावती (एफ.पी.आर.) काय दर्शविते? | मुक्त-दृष्टिक्षेप कालावधी संपलेला आहे. | तो, पॉलिसीचा करार सुरु झाला असल्याचा पुरावा आहे. | आता, पॉलिसी रद्द करता येणार नाही. | पॉलिसीला ठराविक रोख-मूल्य प्राप्त झालेले आहे. | 2 |
| 20 | विमा-कर्ता आणि विमा-कृत व्यक्ती यांच्या दरम्यानच्या कराराचा पुरावा असणारा दस्तऐवज ओळखा. | प्रस्ताव-प्रपत्र | विमा-दावा-प्रपत्र | नाम-निर्देशन-प्रपत्र | पॉलिसी-दस्तऐवज | 4 |

# Insurance Agents (Life) Question Bank - Marathi

| Sr. No. | Question Body_Marathi | Alternative 1_Marathi | Alternative 2_Marathi | Alternative 3_Marathi | Alternative 4_Marathi | Correct Alternatives position |
|---|---|---|---|---|---|---|
| 21 | जोखीम-अंकनाच्या सांख्यिक गुणांकन पद्धतीच्या संदर्भात, खालील विधानांपैकी कोणते एक, चूक आहे? | या पद्धतीच्या अंतर्गत, जोखीम-अंकन-कर्ता, सर्व नकारात्मक किंवा प्रतिकूल घटकांसाठी, धनात्मक दर्जांकन लागू करतात. | या पद्धतीच्या अंतर्गत, जोखीम-अंकन-कर्ता, सर्व सकारात्मक किंवा अनुकूल घटकांसाठी, धनात्मक दर्जांकन लागू करतात. | या पद्धतीच्या अंतर्गत, असे लागू करण्यात आलेले, एकूण गुण, त्यास किती अतिरिक्त-मर्त्यता-दर्जांकन (ई.एम.आर.) देण्यात आलेले आहे, हे ठरवितात. | या पद्धतीच्या अंतर्गत, जर, अतिरिक्त-मर्त्यता-दर्जांकन (ई.एम.आर.), हे खूप जास्त असेल, तर, विमा नाकारला देखील जाऊ शकतो. | 2 |
| 22 | जोखीम-अंकनाच्या न्याय-निर्णय पद्धतीच्या संदर्भात, खालील विधानांपैकी कोणते एक, चूक आहे? | या पद्धतीच्या अंतर्गत, व्यक्ति-निष्ठ निर्णय वापरले जातात. | ही पद्धत, विशेषतः, जटील प्रकरणांच्या बाबतीत वापरली जाते. | या पद्धतीमध्ये, कंपनी, वैद्यकीय डॉक्टरांचे तज्ञ मत घेऊ शकते. | या पद्धतीमध्ये, जोखीम-अंकनकर्ता, प्रतिकूल घटकांना, धनात्मक किंवा ऋणात्मक दर्जांकन-गुण लागू करतात. | 4 |
| 23 | श्री. विमल, हे, ३२ वर्षे वयाचे, निरोगी, धूम्रपान न करणारे, दारुला किंवा मादक पदार्थांना स्पर्शही न करणारे, व्यक्ती आहेत, ज्यांनी, ए.बी.सी. मर्यादित विमा कंपनी कडून आयुर्विम्याकरिता अर्ज केलेला आहे. खालील विधानांपैकी कोणते एक, विमा कंपनीद्वारा जोखीम-स्वीकृतीच्या बाबतीत, खरे ठरेल? | जोखीम, सामान्य दराने स्वीकारली जाईल. | कोष्टकातील हप्त्यांच्या दरावर अतिरिक्त दर आकारुन, जोखीम स्वीकारली जाईल. | जोखीम, विमा-राशिवर धारणाधिकारासहित, स्वीकारली जाईल. | जोखीम, प्रतिबंधात्मक कलमांसह स्वीकारली जाईल. | 1 |

# Insurance Agents (Life) Question Bank - Marathi

| Sr. No. | Question Body_Marathi | Alternative 1_Marathi | Alternative 2_Marathi | Alternative 3_Marathi | Alternative 4_Marathi | Correct Alternatives position |
|---|---|---|---|---|---|---|
| 24 | जर, श्री. ब्रिजेश, एक ४० वर्षीय व्यक्ती, विमा कंपनी द्वारे, एक 'उप-मानक जोखीम' म्हणून मानले गेलेले आहेत, तर, खालील विधानांपैकी कोणते एक, विमा कंपनी द्वारे जोखीम-स्वीकृतीच्या बाबतीत, खरे ठरेल? | जोखीम, सामान्य दराने स्वीकारली जाईल. | जोखीम, कमी दराने स्वीकारली जाईल. | कोष्टकातील हप्त्यांच्या दरावर अतिरिक्त दर आकारुन, जोखीम स्वीकारली जाईल. | जोखीम, फेटाळली जाईल. | 3 |
| 25 | 'जोखीम-वर्गीकरण' म्हणजे काय? सर्वाधिक योग्य पर्याय निवडा. | एक अशी प्रक्रिया, जिच्यामध्ये, व्यक्तिगत जीवने, त्यांनी दर्शविलेल्या जोखीमांच्या प्रमाणानुसार, वर्गीकृत केली जातात, आणि विविध जोखीम-वर्गांमध्ये समाविष्ट केली जातात. | अशा लोकांची प्रवृत्ती, ज्यांना नुकसान होण्याची शक्यता अतिशय जास्त आहे अशी शंका असते किंवा माहिती असते; ते विमा घेण्यासाठी व त्या प्रक्रियेत नफा मिळविण्यासाठी अतिशय अधीर असतात. | आयुर्विम्यासाठीच्या प्रत्येक प्रस्तावाचे, त्यांनी दर्शविलेल्या जोखीमेच्या प्रमाणाच्या संदर्भात मूल्यमापन करण्याची; आणि नंतर, विमा देण्याचे किंवा न देण्याचे आणि कोणत्या अटींवर देण्याचे ठरविण्याची प्रक्रिया. | एक अशी प्रक्रिया, जिच्यामध्ये, अर्जदार, जे जोखीमेच्या समान प्रमाणांचा सामना करतात, तशाच समान विमा-हप्ता-श्रेणीत समाविष्ट केले जातात. | 1 |
| 26 | श्री. निमेश यांनी, 20 वर्षांची युनिट-संलग्न विमा योजना खरेदी केलेली होती. श्री. निमेश यांचा मृत्यु, पॉलिसी-कालावधीत होण्याच्या घटनेत, खालील पैकी काय दिले जाईल? | अभ्यर्पण-मूल्य | थकबाकी वजा केल्यानंतर, अदा केलेले हप्ते | विमा-रक्कम किंवा निधी-मूल्य यांपैकी, जे कमी असेल ते | विमा-रक्कम किंवा निधी-मूल्य यांपैकी, जे जास्त असेल ते | 4 |

| Insurance Agents (Life) Question Bank - Marathi | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Question Body_Marathi | Alternative 1_Marathi | Alternative 2_Marathi | Alternative 3_Marathi | Alternative 4_Marathi | Correct Alternatives position |
| 27 | आयुर्विमा-कृत व्यक्तीच्या मृत्युच्या अनुमानाच्या बाबतीत, नाम-निर्देशित व्यक्तीला, खालील दस्तऐवजांपैकी कोणते एक, सादर करणे आवश्यक असते? | महानगरपालिकेकडील मृत्यू-प्रमाण-पत्र. | एका सक्षम न्यायालयाकडून हुकुम. | नियोक्त्यांचे प्रमाण-पत्र. | मृत्यूच्या कारणांच्या अधिकृत चौकशीचा अहवाल. | 2 |
| 28 | श्री. ब्रिजेश यांनी, ए.बी.सी. विमा कंपनीकडून, 20 वर्षांची युनिट-संलग्न विमा योजना (यू.एल.आय.पी.) खरेदी केलेली होती. जर, श्री. ब्रिजेश यांचा मृत्यू, पॉलिसीच्या मुदत-पूर्तीपूर्वी झाला, तर विमा कंपनीला --- द्यावे लगेल. | अभ्यर्पण-मूल्य | थकबाकी वजा केल्यानंतर, अदा केलेले हप्ते | विमा-रक्कम किंवा निधी-मूल्य यांपैकी, जे कमी असेल ते | विमा-रक्कम किंवा निधी-मूल्य यांपैकी, जे जास्त असेल ते | 4 |
| 29 | खालील दाव्यांपैकी कोणता, केवळ नामनिर्देशित व्यक्ती किंवा अभिहस्तांकित व्यक्ती यांनाच देय असतो? | मृत्यू विमा-दावा | मुदत-पूर्ती विमा-दावा | विद्यमानता-लाभ | अभ्यर्पण-मूल्य | 1 |

# Insurance Agents (Life) Question Bank - Marathi

| Sr. No. | Question Body_Marathi | Alternative 1_Marathi | Alternative 2_Marathi | Alternative 3_Marathi | Alternative 4_Marathi | Correct Alternatives position |
|---|---|---|---|---|---|---|
| 30 | आयुर्विमा-कृत व्यक्तीचा नैसर्गिक मृत्यू झाल्यास, नाम-निर्देशित व्यक्तीला, खालील दस्तऐवजांपैकी कोणते एक, सादर करावे लागते? सर्वाधिक योग्य पर्याय निवडा. | मृत्यूच्या कारणांच्या अधिकृत चौकशीचा अहवाल | मृत्यु-प्रमाण-पत्र | शव-विच्छेदन अहवाल | प्रथम सूचना अहवाल (एफ.आय.आर.) | 2 |
| 31 | तुम्ही विमा एजंट आहात. श्री महेश यांनी काही विमा खरेदी करण्यासाठी ग्राहक म्हणून तुमच्याशी संपर्क साधला आहे. आपण मित्रांकडून ऐकले आहे की श्री महेश पायरेटेड (तस्करी संबधित) वस्तूंच्या विक्रीमध्ये गुंतलेले आहेत आणि त्यातून मिळालेला रोख पैसा जीवन विमा खरेदी करण्यात गुंतवला जात आहे. तुम्ही काय करायला हवे? | विक्री पूर्ण करण्यावर आणि कमिशन सुरक्षित करण्यावर लक्ष केंद्रित करा | श्री महेशबद्दल तुमच्याकडे असलेल्या सर्व माहितीसह संशयास्पद व्यवहाराची तक्रार करा | श्री महेशला ब्लॅकमेल करा आणि त्याच्याकडून काही आर्थिक लाभ मिळवण्याचा प्रयत्न करा | व्यवहाराबद्दल मौन ठेवा | 2 |

# Insurance Agents (Life) Question Bank - Marathi

| Sr. No. | Question Body_Marathi | Alternative 1_Marathi | Alternative 2_Marathi | Alternative 3_Marathi | Alternative 4_Marathi | Correct Alternatives position |
|---|---|---|---|---|---|---|
| 32 | माहिती पुस्तिकेत (प्रॉस्पेक्टस) उघड केलेल्या महत्वाच्या माहितीमध्ये खालील समाविष्ट असते:<br>I. लवकर प्रवेशासाठी पॉलिसीधारकांना बक्षीसाचे कोणतेही प्रोत्साहन<br>II. पॉलिसीधारकांना सतत नूतनीकरणासाठी बक्षीसाचे कोणतेही प्रोत्साहन<br>III. अनुकूल दाव्यांच्या अनुभवासाठी पॉलिसीधारकांना बक्षीसाचे कोणतेही प्रोत्साहन | फक्त I | I आणि II | II आणि III | I, II आणि III | 1 |

| Insurance Agents (Life) Question Bank - Marathi | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Question Body_Marathi | Alternative 1_Marathi | Alternative 2_Marathi | Alternative 3_Marathi | Alternative 4_Marathi | Correct Alternatives position |
| 33 | जर, एखादा विशिष्ट पॉलिसी-दस्तऐवज तयार करताना, जटिल भाषा वापरण्यात आली असेल, आणि त्यामुळे एखादी संदिग्धता निर्माण झाली असेल, तर सर्वसाधारणपणे, त्याचा अर्थ, कसा लावला जाईल? | विमा-धारकास अनुकूल. | विमा-कर्त्यास अनुकूल. | पॉलिसी रद्द घोषित केली जाईल, आणि विमा-धारकांना, व्याजासहित विमा-हप्ते परत करण्यास, विमा-कर्त्यास सांगितले जाईल. | पॉलिसी रद्द घोषित केली जाईल, आणि विमा-धारकांना कोणत्याही व्याजाशिवाय विमा-हप्ते परत करण्यास, विमा-कर्त्यास सांगितले जाईल. | 1 |
| 34 | खालील पैकी काय, एका प्रमाणभूत पॉलिसी-दस्तऐवजाचा एक भाग नाही? | पॉलिसी-अनुसूची | प्रमाणभूत तरतुदी | पॉलिसी-विशिष्ट तरतुदी | पॉलिसी जप्त करण्याच्या तरतुदी | 4 |
| 35 | एका मानक पॉलिसी-तरतुदीचे एक उदाहरण, आम्हांला द्या. | करार केला जात असताना, गर्भवती असलेल्या एका महिलेकरिता, गरोदरपणामुळे आलेला मृत्यु, प्रतिबंधित करणारे, एक कलम. | आत्महत्या कलम. | विशिष्ट आजार, प्रतिबंधित करणारे, एक कलम. | पॉलिसी-धारकांना ठराविक विशेषाधिकार देणारे, एक कलम. | 2 |
| 36 | खालीलपैकी कोणते आजन्म ग्राहक नाही | भूतकाळतील मुल्य | वर्तमान मुल्य | संभाव्य मुल्य | अनुमान केलेले मुल्य | 4 |
| 37 | पुढीलपैकी कोणते सांकेतिक (नॉन-व्हर्बल) संवादाचे उदाहरण नाही? | हाताच्या इशाऱ्याने ठीक असल्याचे संकेत देणे | रिकाम्या खोलीत हातवारे करणे | दागिने घालणे | आपला आवाज वाढवणे | 2 |

| Sr. No. | Question Body_Marathi | Alternative 1_Marathi | Alternative 2_Marathi | Alternative 3_Marathi | Alternative 4_Marathi | Correct Alternatives position |
|---|---|---|---|---|---|---|
| 38 | आश्वासन दिल्याप्रमाणे सेवा विश्वासार्हतेने आणि अचूकपणे पार पाडण्याच्या क्षमतेला ___________ असे म्हणतात | मूर्त | विश्वसनीयता | आश्वासन | प्रतिसाद | 2 |
| 39 | सेवाकर्त्याचे ज्ञान, क्षमता आणि सौजन्य त्याचप्रमाणे विश्वास आणि आत्मविश्वास व्यक्त करण्याची त्यांची क्षमता याला ___________ असे म्हणतात. | विश्वसनीयता | आश्वासन | प्रतिसाद | मूर्त | 2 |
| 40 | अनुग्रह-कालावधीच्या बाबत, अचूक विधान निवडा. सर्वाधिक योग्य पर्याय निवडा. | अनुग्रह-कालावधीचा सर्वसाधारण अवधी, हा १ महिना किंवा ३१ दिवसांचा असतो. | अनुग्रह-कालावधीचा सर्वसाधारण अवधी, हा १ तिमाहीचा असतो. | अनुग्रह-कालावधीचा सर्वसाधारण अवधी, हा १ आठवड्याचा असतो. | अनुग्रह-कालावधीचा सर्वसाधारण अवधी, हा १ पंधरवड्याचा असतो. | 1 |
| 41 | ग्राहक संरक्षण कायद्यात _________ या अर्ध-न्यायिक यंत्रणेचा समावेश आहे | एक-स्तरीय | त्रिस्तरीय | द्विस्तरीय | चार-स्तरीय | 2 |
| 42 | ग्राहक न्यायालयात तक्रार दाखल करण्याच्या प्रक्रियेसंबंधात पुढीलपैकी कोणते विधान चुकीचे आहे? | तक्रारदार स्वतः व्यतिरिक्त इतर कोणीही राज्य किंवा राष्ट्रीय आयोगाकडे तक्रार दाखल करू शकत नाही | राज्य आयोग किंवा राष्ट्रीय आयोगाकडे तक्रार दाखल करण्यासाठी कोणतेही शुल्क नाही | तक्रार वैयक्तिकरित्या दाखल केली जाऊ शकते किंवा पोस्टाने देखील पाठविली जाऊ शकते | तक्रार दाखल करण्यासाठी वकिलाची गरज नाही | 1 |

# Insurance Agents (Life) Question Bank - Marathi

| Sr. No. | Question Body_Marathi | Alternative 1_Marathi | Alternative 2_Marathi | Alternative 3_Marathi | Alternative 4_Marathi | Correct Alternatives position |
|---|---|---|---|---|---|---|
| 43 | पॉलिसीधारक कोणत्याही विमा कंपनीविरुद्ध थेट राज्य आयोगाकडे तक्रार करू इच्छित असल्यास, खालीलपैकी कोणत्या प्रकरणात तो/ती असे करू शकतो? | जिथे दावा केलेल्या वस्तू/सेवांचे मूल्य आणि नुकसानभरपाई रू. 20 लाखांपर्यंत आहे | जिथे माल/सेवा आणि नुकसान भरपाईचे मूल्य रु. 20 लाखापेक्षा जास्त परंतु रु. 100 लाखापेक्षा जास्त नाही. | जिथे दावा केलेल्या वस्तू/सेवा आणि नुकसानभरपाईचे मूल्य रु. 100 लाखांपेक्षा जास्त आहे. | जिथे माल/सेवा आणि नुकसान भरपाईचे मूल्य रु. 10 कोटी पेक्षा जास्त आहे. | 2 |
| 44 | राज्य आयोगाबाबत खालीलपैकी कोणते विधान चुकीचे आहे? | या निवारण प्राधिकरणाकडे मूळ, अपीलीय आणि पर्यवेक्षीय अधिकार क्षेत्र आहे | हे राष्ट्रीय आयोगाकडून आलेल्या अपीलांवर विचार करते | माल/सेवेचे मूल्य आणि नुकसानभरपाईची रक्कम, जर रु. 1 कोटी पेक्षा जास्त पण रु.10 कोटीपेक्षा कमी असेल तर अशा तक्रारींचा विचार करण्याचे हे मूळ अधिकारक्षेत्र आहे. | राज्य आयोगाकडे तक्रार करण्यासाठी कोणतेही शुल्क आकारले जात नाही | 2 |
| 45 | खालीलपैकी कोणता नियम चुकीचा आहे जो लोकपाल पारित करु शकणाऱ्या निर्णया संबंधात आहे? | निर्णयाची रक्कम रु. 50 लाखपेक्षा जास्त असावी. | तक्रार प्राप्त झाल्यापासून ३ महिन्यांच्या आत निर्णय दिला जावा | विमाकर्त्याने निर्णयाचे पालन केले पाहिजे आणि असे स्वीकृती पत्र मिळाल्यानंतर 15 दिवसांच्या आत लोकपालला लेखी सूचना पाठवली पाहिजे. | जर विमाधारकाने निर्णय स्वीकारल्याची लेखी सूचना दिली नाही, तर विमाकर्ता निर्णयाची अंमलबजावणी कदाचित करू शकणार नाही. | 1 |
| 46 | खालीलपैकी कोणत्या कायद्यात विमा कंपन्यांच्या कामकाजावर देखरेख आणि नियंत्रण ठेवण्याची तरतूद आहे? | आयआरडीएआय कायदा, 1999 | डिपॉझिट इन्शुरन्स ॲन्ड क्रेडिट गॅरेंटी कॉर्पोरेशन ॲक्ट 1961 | सार्वजनिक दायित्व विमा कायदा, 1991 | विमा कायदा, 1938 आणि त्यानंतरची सुधारणा | 4 |

| Sr. No. | Question Body_Marathi | Alternative 1_Marathi | Alternative 2_Marathi | Alternative 3_Marathi | Alternative 4_Marathi | Correct Alternatives position |
|---|---|---|---|---|---|---|
| 47 | खालील संस्थांपैकी कोणती एक, भारतातामध्ये, वैयक्तिक विमा-प्रतिनिधी म्हणून काम करण्याकरिता परवाना जारी करु शकते? | अर्थ मंत्रालय | भारत सरकार | भारतीय आयुर्विमा विमा महामंडळ (एल.आय.सी.) आणि साधारण विमा महामंडळ (जी.आय.सी.), संयुक्तपणे. | भारतीय विमा नियामक आणि विकास प्राधिकरण (आय.आर.डी.ए.आय.) | 4 |
| 48 | ज्या विमा-प्रतिनिधीकडे, आयुर्विमा-कर्ता, साधारण विमा-कर्ता, आणि आरोग्य विमा-कर्ता, अशा तिघांच्या कडे काम करण्यासाठी परवाना आहे, त्यांना --- म्हणतात. | दलाल | निगमित विमा-प्रतिनिधी | तृतीय-पक्ष प्रशासक (टी.पी.ए.) | संमिश्र विमा प्रतिनिधी | 4 |
| 49 | एका निर्देशित व्यक्तीची, किमान शैक्षणिक पात्रता --- आहे. | दहावी | बारावी | पदवीधर | पदव्युत्तर | 2 |
| 50 | एका विमा-कर्त्यांचे एक विमा-प्रतिनिधी म्हणून नियुक्ती इच्छिणाऱ्या, एका अर्जदारांना, एक अर्ज, --- या प्रपत्रामध्ये, --- यांच्याकडे सादर करावा लागेल. | ।-ए, नियुक्त अधिकृत | ए.।-ए, अपीलीय अधिकारी | ।-बी, नियुक्त अधिकृत | ।-बी, अपीलीय अधिकारी | 1 |

| Insurance Agents (Life) Question Bank - Marathi | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Question Body_Marathi | Alternative 1_Marathi | Alternative 2_Marathi | Alternative 3_Marathi | Alternative 4_Marathi | Correct Alternatives position |
| 51 | जीवन आणि सर्वसाधारण विम्याच्या संदर्भात अकस्मात घडणाऱ्या घटनेच्या संभाव्यतेची तुलना करा. | घटना घडण्याची संभाव्यता जीवन आणि सर्वसाधारण विमा या दोन्हींच्या संदर्भात दिलेल्या कालावधीत स्थिर राहते | घटना घडण्याची शक्यता सर्वसाधारण विम्याच्या बाबतीत वाढते आणि जीवन विम्याच्या बाबतीत कमी होते | जीवन विम्याच्या बाबतीत घटना घडण्याची शक्यता वाढते आणि सर्वसाधारण विम्याच्या बाबतीत कमी होते | जीवन विम्याच्या बाबतीत घटना घडण्याची शक्यता वाढते आणि ठराविक कालावधीत सर्वसाधारण विम्याच्या बाबतीत स्थिर राहते | 4 |
| 52 | खालील दोन विधानांचे विश्लेषण करा आणि खरे विधान निश्चित करा<br>विधान I: सर्वसाधारण विम्याच्या बाबतीत आकस्मिक घटना नक्कीच घडते<br>विधान II: जीवन विम्याच्या बाबतीत आकस्मिक घटना नक्कीच घडते | फक्त विधान I सत्य आहे | फक्त विधान II सत्य आहे | विधान I आणि II सत्य आहेत | विधान I आणि II असत्य आहेत | 2 |
| 53 | पत किंवा प्रतिष्ठा याचे नुकसान होण्यापासून संरक्षण देणारा विम्याचा वर्ग सूचवा. | जीवन विमा | मालमत्ता विमा | दायित्व विमा | वैयक्तिक विमा | 3 |

## Insurance Agents (Life) Question Bank - Marathi

| Sr. No. | Question Body_Marathi | Alternative 1_Marathi | Alternative 2_Marathi | Alternative 3_Marathi | Alternative 4_Marathi | Correct Alternatives position |
|---|---|---|---|---|---|---|
| 54 | खालील दोन विधानांचे विश्लेषण करा, आणि सत्य विधान(ने) ठरवा. विधान-I: साधारण विम्याच्या बाबतीत, आकस्मिक-घटना निश्चितपणे घडतात. विधान-II: आयुर्विम्याच्या बाबतीत, आकस्मिक घटना निश्चितपणे घडतात. | विधान-I सत्य आहे. | विधान-II सत्य आहे. | विधान-I आणि विधान-II सत्य आहेत. | विधान-I आणि विधान-II असत्य आहेत. | 2 |
| 55 | 'जोखीम-सहनशीलता' स्पष्ट करा. सर्वाधिक योग्य पर्याय निवडा. | एखादी व्यक्ती घेऊ शकेल, अशा जोखीमांचे प्रकार. | गुंतवणूक करताना, एखादी व्यक्ती घेऊ इच्छिते, अशी जोखीमेची रक्कम. | जोखीम-व्यवस्थापनाची साधने. | असा कालावधी, जितक्या करिता, एखादी व्यक्ती, आपली गुंतवणूक, ठेऊ इच्छिते. | 2 |
| 56 | तुमच्या गुंतवणुकीच्या परताव्यावर चलनवाढीच्या परिणामाचे मूल्यांकन करा. | गुंतवणुकीच्या परताव्यावर चलनवाढीचा कोणताही परिणाम होत नाही | गुंतवणुकीच्या परताव्यावर चलनवाढीचा सकारात्मक परिणाम होतो | गुंतवणुकीचा परतावा महागाईमुळे क्षीण होतो | चलनवाढीमुळे गुंतवणुकीचा परतावा वाढतो | 3 |
| 57 | जीवनाचा टप्पा ओळखा जेव्हा एखाद्या व्यक्तीला त्याच्या दीर्घकालीन बचतीचे मूल्य सर्वात जास्त चांगल्याप्रकारे समजेल. | बालपण | नवविवाहित | किशोरवयीन | निवृत्तीनंतर | 4 |

# Insurance Agents (Life) Question Bank - Marathi

| Sr. No. | Question Body_Marathi | Alternative 1_Marathi | Alternative 2_Marathi | Alternative 3_Marathi | Alternative 4_Marathi | Correct Alternatives position |
|---|---|---|---|---|---|---|
| 58 | कर नियोजनाच्या उद्देशाचे वर्णन करा. सर्वात योग्य पर्याय निवडा. | कर चुकवणे | तुमच्या गुंतवणुकीचे नियोजन अशा प्रकारे करणे की जास्तीत जास्त कर लाभ लागू होतील | करासाठी तरतूद करणे | वेळेवर कर भरणे | 2 |
| 59 | जोखीम सहनशीलता स्पष्ट करा. सर्वात योग्य पर्याय निवडा. | व्यक्ती घेऊ शकणाऱ्या जोखमींचे प्रकार | गुंतवणूक करताना व्यक्तिची जोखीम घेण्यास असलेली तयारी | जोखीम व्यवस्थापनाची साधने | ज्या कालावधीसाठी एखादी व्यक्ती आपली गुंतवणूकीबाबत जोखीम घेण्यास तयार आहे | 2 |
| 60 | आकस्मिक योजनांतर्गत ज्याचे वर्गीकरण केले जाऊ शकते अशा विमा योजना ओळखा. सर्वात योग्य पर्याय निवडा. | बँकेतील ठेवी | शेअर्स | कर्जरोखे | जीवन विमा | 4 |
| 61 | विशुद्ध मुदत विमा योजनेची दुसरी बाजू ओळखा. | हा विम्याचा सर्वात स्वस्त प्रकार आहे | ती आजीवन विमा योजनेत रूपांतरित केली जाऊ शकते | ती मुदतपूर्तीनंतर कोणताही परतावा देत नाही. | हे उत्पन्न बदलण्याची योजना म्हणून हाताशी असते. | 3 |
| 62 | तुम्ही आणि तुमच्याच वयाच्या मित्राने एकाच तारखेला जीवन विमा पॉलिसी खरेदी केली पण तुम्ही त्याच्यापेक्षा जास्त प्रिमियम भरत आहात. तुमचा मृत्यू झाल्यास लाभार्थीला दिल्या जाणाऱ्या भरपाईवर त्याचा काय परिणाम होईल? | भरपाई तशीच राहिल | भरपाई जास्त असेल | भरपाई कमी असेल | भरपाई मिळणार नाही | 2 |

| Insurance Agents (Life) Question Bank - Marathi | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **Sr. No.** | **Question Body_Marathi** | **Alternative 1_Marathi** | **Alternative 2_Marathi** | **Alternative 3_Marathi** | **Alternative 4_Marathi** | **Correct Alternatives position** |
| 63 | टर्म इन्शुरन्सचा यूएसपी (unique selling proposition) (विक्रीचे वैशिष्ट) स्पष्ट करा. सर्वात योग्य पर्याय निवडा. | कमी किंमत | कवच | गुंतवणुकीवरील परतावा | रायडर्सची निवड | 1 |
| 64 | समाराने मुदत विमा पॉलिसी खरेदी केली जेव्हा तिला जीवन विम्याची जास्त गरज होती आणि मर्यादित उत्पन्न होते. आता समारा आजीवन विमा घेऊ शकते. मुदत जीवन विम्याची कोणती तरतूद समाराला ती अजूनही विमा पात्र आहे हे दाखविल्याशिवाय तिचा मुदत विमा, आजीवन विम्यामध्ये बदलण्याची अनुमती देईल? | फेरफार | रूपांतरण | देवाणघेवाण | बदल | 2 |

# Insurance Agents (Life) Question Bank - Marathi

| Sr. No. | Question Body_Marathi | Alternative 1_Marathi | Alternative 2_Marathi | Alternative 3_Marathi | Alternative 4_Marathi | Correct Alternatives position |
|---|---|---|---|---|---|---|
| 65 | मायकेलला खात्री करायची आहे की तो मरण पावला तर त्याची तारण थकबाकी परत देण्यासाठी जीवन विम्याची रक्कम उपलब्ध आहे. त्याने एक प्रकारचा जीवन विमा खरेदी केला ज्यामध्ये जशी त्याची थारण थकबाकी कमी होत जाईल तसे विम्याचे संरक्षण हळूहळू कमी होत जाईल. मायकेलने कोणत्या प्रकारचा विमा खरेदी केला आहे ते आम्हाला सांगा. | घटता लाभ विमा | घटता रायडर लाभ | घटता मुदती विमा | पुनर्प्रवेश मुदत विमा | 3 |
| 66 | आयआरडीएआयच्या नियमांनुसार, विमा कंपनी खालीलपैकी कोणते अपारंपारिक बचत जीवन विमा उत्पादन भारतात देऊ शकते?<br><br>पर्याय I: यूनिट लिंक्ड विमा योजना<br>पर्याय II: परिवर्तनीय विमा योजना | फक्त I | फक्त II | दोन्ही: I आणि II | I किंवा II पैकी कोणतेच नाही | 1 |

| Sr. No. | Question Body_Marathi | Alternative 1_Marathi | Alternative 2_Marathi | Alternative 3_Marathi | Alternative 4_Marathi | Correct Alternatives position |
|---|---|---|---|---|---|---|
| 67 | रमेश यांनी इक्विटी फंडाद्वारे त्यांचा यूलिप प्रिमियम वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. विमा कंपनी त्यांचे प्रिमियम कोठे गुंतवेल? | स्टॉक्स | सरकारी किंवा कॉर्पोरेट डेट | इक्विटी संबंधित दस्तऐवजांमध्ये तसेच सरकारी किंवा कॉर्पोरेट डेट दोन्हीमध्ये | कमर्शियल पेपर किंवा ट्रेझरी बिले | 1 |
| 68 | यूलिप च्या बाबतीत एनएव्ही चा अर्थ काय आहे | विमाकर्त्याची एकूण निव्वळ संपत्ती | विमाकर्त्याची मालमत्ता | ज्या मालमत्तेमध्ये फंड गुंतवला आहे त्याचे बाजार मूल्य | विमाकर्त्याचे दायित्व | 3 |
| 69 | कार्ल जीवन विमा खरेदी करू इच्छितो. त्याला म्युच्युअल फंडातही गुंतवणूक करायची आहे. एका एजंटने कार्लला जीवन विम्याच्या प्रकाराबद्दल सांगितले ज्यामध्ये बचतीची रक्कम कुठे गुंतवली जाईल हे कार्ल निवडू शकतो. जीवन विम्याच्या या स्वरूपामध्ये जोखीम प्रिमियम निश्चित केला जातो आणि बचत पॉलिसींची गुंतवणूक केली जाते. एजंट कोणत्या प्रकारच्या विम्याचा संदर्भ देत आहे? | बंदोबस्ती जीवन विमा | यूलिप | आजीवन | मुदत विमा | 2 |

# Insurance Agents (Life) Question Bank - Marathi

| Sr. No. | Question Body_Marathi | Alternative 1_Marathi | Alternative 2_Marathi | Alternative 3_Marathi | Alternative 4_Marathi | Correct Alternatives position |
|---|---|---|---|---|---|---|
| 70 | "मुदतीचा आयुर्विमा खरेदी करा आणि फरक इतरत्र गुंतवा" यामागील प्राथमिक तर्क काय होता? सर्वाधिक योग्य पर्याय निवडा. | मुदतीचा आयुर्विमा हे आयुर्विम्याचे सर्वोत्तम प्रारुप आहे. | इतर गुंतवणूक साधनांमध्ये शिल्लक हप्ते गुंतविल्याने, उच्च परतावा मिळू शकतो. | समभागांमध्ये बाकी हप्ते गुंतवून, पॉलिसी-धारक, उच्च जोखीम घेऊ शकतात. | बिगर-मुदतीच्या आयुर्विम्यातून सर्वात कमी परतावा मिळतो. | 2 |
| 71 | एमडब्ल्युपी कायद्याचे कोणते कलम पत्नी आणि मुलांना जीवन विमा पॉलिसी अंतर्गत लाभांची सुरक्षा प्रदान करते. | कलम 38 | कलम 39 | कलम 6 | कलम 45 | 3 |
| 72 | प्रमुख व्यक्ति (कीमॅन) विमा पॉलिसी घेण्याचे फायदे ओळखा. | नवीन व्यवसाय खर्चाची भरपाई केली जाते | व्यवसाय सातत्यातील खर्चाची भरपाई केली | व्यवसाय पुनर्निमाण खर्चाची भरपाई केली जाते. | कामगारांमधील सलोखा वाढवला जातो. | 2 |
| 73 | प्रमुख व्यक्ति (कीमॅन) विमा अंतर्गत संरक्षित केलेले नुकसान निवडा. | मालमत्तेची चोरी | जेव्हा एखादी प्रमुख व्यक्ती काम करू शकत नाही त्या दीर्घ कालावधीतील संबंधित नुकसान | त्रुटी आणि चुकांमुळे झालेले नुकसान | सामान्य दायित्व | 2 |
| 74 | प्रमुख व्यक्ति (कीमॅन) विमा मंजूर करण्यासाठीच्या सामान्य आवश्यकता स्पष्ट करा. | कंपनी तोट्यात असावी | कंपनी फायदेशीर असणे आवश्यक आहे | कंपनी 6 महिन्यांपेक्षा कमी कालावधीसाठी व्यवसायात असणे आवश्यक आहे | कंपनी 1 वर्षापेक्षा कमी कालावधीसाठी व्यवसायात असणे आवश्यक आहे | 2 |

| Sr. No. | Question Body_Marathi | Alternative 1_Marathi | Alternative 2_Marathi | Alternative 3_Marathi | Alternative 4_Marathi | Correct Alternatives position |
|---|---|---|---|---|---|---|
| 75 | विवाहित महिला मालमत्ता कायद्याच्या कलम 6 अंतर्गत लागू केलेल्या पॉलिसीसाठी दाव्याचे पैसे कोणाला दिले जातात? | नियुक्ती | विश्वस्त | नामनिर्देशित | मुखत्यारी | 2 |
| 76 | वृद्ध लोकांच्या तुलनेत तरुणांना कमी आयुर्विमा प्रीमियम का आकारला जातो हे स्पष्ट करा. | वृद्ध लोकांइतकी तरुणांना जीवन विम्याची गरज नसते | कमी उत्पन्नामुळे तरुणांना महाग जीवन विमा योजना घेणे परवडत नाही | मृत्यू दर थेट वयाच्या प्रमाणात असतो. | मृत्युदर वयाच्या व्यस्त प्रमाणात असतो. | 4 |
| 77 | जीवन विम्यामधील मूल्यांकनाचा अर्थ काय आहे? | जीवन विमा कंपनीचा नफा ठरविण्याची प्रक्रिया | जीवन विमा पॉलिसीसाठी निव्वळ प्रिमियम निश्चित करण्याची प्रक्रिया | जीवन विमा कंपनीत बोनस तयार करण्याची प्रक्रिया | जीवन विमा कंपनीमध्ये सर्व विद्यमान पॉलिसींचे मूल्य ज्या प्रक्रियेद्वारे निश्चित केले जाते ती प्रक्रिया | 4 |
| 78 | ___________ च्या बाबतीत, कंपनी बोनसला मूळ लाभाची टक्केवारी आणि पूर्वीचा संलग्न बोनस म्हणून दर्शवते. | प्रत्यावर्ती बोनस | चक्रवाढीय बोनस | अंतिम बोनस | सातत्य बोनस | 2 |
| 79 | दोन पॉलिसी वैशिष्ट्यांची नावे द्या ज्यावर विमाकर्त्याकडून प्रिमियमवर सूट दिली जाऊ शकते. | पॉलिसी योजना आणि जोखीम कवच | पॉलिसी योजना आणि प्रिमियमची पद्धत | विम्याची रक्कम आणि प्रिमियमची पद्धत | विम्याची रक्कम आणि पॉलिसी योजना | 3 |

| Insurance Agents (Life) Question Bank - Marathi | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Question Body_Marathi | Alternative 1_Marathi | Alternative 2_Marathi | Alternative 3_Marathi | Alternative 4_Marathi | Correct Alternatives position |
| 80 | विमा कंपन्यांनी गृहीत धरलेल्या प्रिमियमवर व्याजदराचा प्रभाव स्पष्ट करा. | गृहीत धरलेले व्याजदर कमी तर, प्रिमियम कमी | जितका जास्त व्याजदर गृहीत धरला जाईल तितका प्रिमियम जास्त | गृहीत धरलेले व्याजदर जास्त तर प्रिमियम कमी | व्याजदर प्रिमियमवर परिणाम करत नाहीत | 3 |
| 81 | जीवन विमा पॉलिसींमध्ये वाढीव कालावधीचे कलम काय प्रदान करते ते स्पष्ट करा. | त्या कालावधीत विमाधारकाला प्रिमियम भरावा लागत नाही | विमाधारकाला फक्त अर्धी प्रिमियम रक्कम भरावी लागते | देय तारखेनंतरही विमाधारकाला प्रिमियम भरण्यासाठी काही अतिरिक्त वेळ असतो | हे पुनर्विचार कालावधी 30 दिवसांनी वाढवते | 3 |
| 82 | विमा पॉलिसीसाठी विमा कायद्याच्या _______ अंतर्गत नामनिर्देशनास परवानगी आहे. | कलम 10 | कलम 38 | कलम 39 | कलम 45 | 3 |
| 83 | पॉलिसीचे पुनरुज्जीवन करताना विमा योग्यतेचा पुरावा आवश्यक असेल असा प्रसंग तयार करा. | पॉलिसी रद्द होऊन एक आठवडा झाला आहे | एक वर्षाहून अधिक काळ पॉलिसी रद्द झाली आहे | एक वर्षापासून पॉलिसी  लागू आहे | पॉलिसीच्या बदल्यात कर्ज मागितले आहे | 2 |
| 84 | वाढीव कालावधीच्या संदर्भात योग्य विधान निवडा. सर्वात योग्य पर्याय निवडा | प्रमाणित वाढीव कालावधी एक महिना आहे. | प्रमाणित वाढीव कालावधी तीन महिने आहे. | प्रमाणित वाढीव कालावधी एक आठवडा आहे. | प्रमाणित वाढीव कालावधी एका पंधरवड्याचा आहे. | 1 |

| Sr. No. | Question Body_Marathi | Alternative 1_Marathi | Alternative 2_Marathi | Alternative 3_Marathi | Alternative 4_Marathi | Correct Alternatives position |
|---|---|---|---|---|---|---|
| 85 | खालील दोन विधाने तपासा आणि जे सत्य आहे ते निवडा.<br>।: विमाधारक एकापेक्षा जास्त व्यक्तींना नॉमिनी म्हणून नियुक्त करू शकतो<br>॥: पॉलिसी सुरू झाल्यानंतरच अभिहस्तांतरण केले जाऊ शकते | फक्त । | फक्त ॥ | । आणि ॥ | । किंवा ॥ कोणतेही नाही | 3 |
| 86 | विपरित निवड संदर्भात खालीलपैकी कोणते विधान बरोबर आहे? | विपरीत निवड ही विमा कंपनी अनैतिक एजंट्सची निवड करत नाही याची खात्री करण्यासाठी वापरली जाणारी प्रक्रिया आहे | विपरीत निवड ही लोकांची प्रवृत्ती आहे, ज्यांना शंका आहे की त्यांचे नुकसान होण्याची शक्यता जास्त आहे, अशा परिस्थितीत ते विमा  घेऊन या प्रक्रियेचा फायदा मिळवतात. | विपरीत निवड ही प्रक्रिया विमा कंपनी संभाव्य पॉलिसीधारकांसाठी योग्य नसलेली विमा उत्पादने बाजारात आणणार नाही याची खात्री करण्यासाठी वापरली जाते. | विपरित निवड ही प्रक्रिया विमा कंपनी पॉलिसीधारकांकडून गोळा केलेले प्रीमियम वापरण्यासाठी चुकीच्या गुंतवणूक योजना निवडत नाही याची खात्री करण्यासाठी वापरली जाते. | 2 |
| 87 | विमालेखनाच्या निर्णय पद्धतीच्या संदर्भात खालीलपैकी कोणते विधान चुकीचे आहे? | या पद्धतीनुसार व्यक्तीनिष्ठ निर्णयाचा वापर केला जातो | ही पद्धत विशेषतः जटिल प्रकरणांच्या बाबतीत वापरली जाते | या पद्धतीत कंपनी तज्ज्ञ डॉक्टरांचे मत घेऊ शकते | या पद्धतीमध्ये विमालेखक प्रतिकूल घटकांना सकारात्मक किंवा नकारात्मक रेटिंग गुण देतात | 4 |

| Sr. No. | Question Body_Marathi | Alternative 1_Marathi | Alternative 2_Marathi | Alternative 3_Marathi | Alternative 4_Marathi | Correct Alternatives position |
|---|---|---|---|---|---|---|
| 88 | __________ याचा अर्थ असा की ज्या अर्जदारांना समान प्रमाणात जोखमीचा सामना करावा लागतो त्यांना एकाच प्रिमियम श्रेणीत ठेवले पाहिजे. | जोखमीची निवड | विपरीत निवड | नैतिक धोका | जोखमींमधील समानता | 4 |
| 89 | जोखीम वर्गीकरणांतर्गत 'सब-स्टँडर्ड लाईफ'(दुय्यम दर्जाचे जीवन)च्या संदर्भात खालीलपैकी कोणते विधान बरोबर आहे? सर्वात योग्य पर्याय निवडा. | दुय्यम दर्जाच्या जीवनामध्ये अशा व्यक्तींचा समावेश होतो ज्यांचे अपेक्षित मृत्युदर, मृत्युदर तक्त्याद्वारे दर्शविलेल्या प्रमाणित जीवनाशी सुसंगत आहेत. | दुय्यम दर्जाच्या जीवनामध्ये अशा व्यक्तींचा समावेश होतो ज्यांचे अपेक्षित मृत्यू दर प्रमाणित जीवनापेक्षा लक्षणीयरित्या कमी आहे आणि त्यामुळे कमी प्रिमियम आकारला जाऊ शकतो. | दुय्यम दर्जाच्या जीवनामध्ये अशा व्यक्तींचा समावेश होतो ज्यांचे अपेक्षित मृत्युदर सरासरी किंवा मानक जीवनापेक्षा जास्त आहेत, परंतु तरीही ते विमायोग्य मानले जातात. | दुय्यम दर्जाच्या जीवनात अशा व्यक्तींचा समावेश होतो ज्यांची दुर्बलता आणि अपेक्षित अतिरिक्त मृत्यू दर इतका मोठा आहे की त्यांना परवडणाऱ्या किमतीत विमा संरक्षण प्रदान केले जाऊ शकत नाही. | 3 |
| 90 | जोखीम वर्गीकरणांतर्गत 'नाकारलेल्या जीवनां'च्या संदर्भात खालीलपैकी कोणते विधान बरोबर आहे? | नाकारलेल्या जीवनांमध्ये अशा व्यक्तींचा समावेश होतो ज्यांचे अपेक्षित मृत्युदर, मृत्युदर तक्त्याद्वारे दर्शविलेल्या प्रमाणित जीवनाशी सुसंगत आहेत. | नाकारलेल्या जीवनात अशा व्यक्तींचा समावेश होतो ज्यांची दुर्बलता आणि अपेक्षित अतिरिक्त मृत्यू दर इतका मोठा आहे की त्यांना परवडणाऱ्या किमतीत विमा संरक्षण प्रदान केले जाऊ शकत नाही. | नाकारलेल्या जीवनांमध्ये अशा व्यक्तींचा समावेश होतो ज्यांचे अपेक्षित मृत्युदर सरासरी किंवा प्रमाणित जीवनापेक्षा जास्त आहे, परंतु तरीही त्यांना विमायोग्य मानले जाते. | नाकारलेल्या जीवनांमध्ये अशा व्यक्तींचा समावेश होतो ज्यांचे अपेक्षित मृत्यूदर प्रमाणित जीवनापेक्षा लक्षणीयरीत्या कमी आहेत आणि त्यामुळे कमी प्रिमियम आकारला जाऊ शकतो. | 2 |

| Sr. No. | Question Body_Marathi | Alternative 1_Marathi | Alternative 2_Marathi | Alternative 3_Marathi | Alternative 4_Marathi | Correct Alternatives position |
|---|---|---|---|---|---|---|
| 91 | पॉलिसीच्या मुदतीदरम्यान विमाधारक रुग्णालयात दाखल झाल्यास जीवन विमा कंपनी विमाधारकाला उपचाराचा खर्च देते. हे _________________ चे उदाहरण आहे. | जीवित लाभ रक्कम | समापन मूल्य | रायडर फायदा | सशर्त अभिहस्तांतरण | 3 |
| 92 | खालीलपैकी कोणता मृत्यू दावा विमा कंपनीकडून लवकर नसलेला मृत्यू दावा मानला जाईल? | पॉलिसी कालावधीच्या एका वर्षाच्या आत विमाधारकाचा मृत्यू झाल्यास | पॉलिसी कालावधीच्या दोन वर्षांच्या आत विमाधारकाचा मृत्यू झाल्यास | पॉलिसी कालावधीच्या तीन वर्षांच्या आत विमाधारकाचा मृत्यू झाल्यास | पॉलिसीच्या पाच वर्षांच्या कालावधीनंतर विमाधारकाचा मृत्यू झाल्यास | 3 |
| 93 | जीवित असतानाच्या दाव्यांना गतिमान करू शकतील अशा विविध घटना आहेत. खालीलपैकी कोणते विधान जीवित असतानाच्या दाव्यांना गतिमान करू शकणाऱ्या घटनांच्या संदर्भात चुकीचे आहे ते ओळखा? | मनी-बॅक पॉलिसी अंतर्गत उद्दिष्ट गाठल्यावरचा देय हप्ता | गंभीर आजार पॉलिसी अंतर्गत रायडर लाभ म्हणून समाविष्ट आहेत | असाइनीने पॉलिसी समर्पित करणे | मुदत विमा योजनेची मुदतपूर्ती | 4 |

| Insurance Agents (Life) Question Bank - Marathi | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Question Body_Marathi | Alternative 1_Marathi | Alternative 2_Marathi | Alternative 3_Marathi | Alternative 4_Marathi | Correct Alternatives position |
| 94 | विमा कंपनीद्वारे समापन मूल्य (विमा योजनेमधून मुदतपूर्तीपूर्वी बाहेर पडण्याचा निर्णय घेतल्यावर मिळणारी रक्कम) देण्याची घटना गतिमान करू शकते अशी घटना ओळखा? | पॉलिसी मुदतीत जीवन विमाधारकाच्या अपघाती मृत्यूवर ही घटना सुरू होईल | ठराविक उद्दिष्ट गाठल्यावर हप्ता देय होईल तेव्हा घटना सुरू होईल | जेव्हा पॉलिसीधारक करार रद्द करण्याचा निर्णय घेतो तेव्हा घटना सुरू होईल | पॉलिसीच्या मुदतपूर्तीनंतर घटना सुरू होईल | 3 |
| 95 | दावा फॉर्ममध्ये खालीलपैकी कोणाचा समावेश आहे?<br>I. प्रस्तावकाचे तपशील आणि पॉलिसी क्रमांक ज्या अंतर्गत दावा केला जातो<br>II. रुग्णाचा तपशील<br>III. दाव्याचे कारण – ज्यासाठी रुग्णालयात दाखल केले गेले आणि आजारपणाचे कारण<br>IV. रुग्णालयातील वास्तव्याचा कालावधी | I, II आणि IV | II, III आणि IV | I, III आणि IV | I, II, III आणि IV | 4 |

| Insurance Agents (Life) Question Bank - Marathi | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Question Body_Marathi | Alternative 1_Marathi | Alternative 2_Marathi | Alternative 3_Marathi | Alternative 4_Marathi | Correct Alternatives position |
| 96 | कर्मचारी राज्य विमा योजनेशी संबंधित खाली दिलेली सर्व विधाने __________ वगळून सत्य आहेत. | ही योजना केंद्र सरकारच्या कर्मचाऱ्यांसाठी सुरू करण्यात आली आहे आणि स्वतःच्या दवाखान्यांच्या आणि रुग्णालयांच्या नेटवर्कजाळ्याद्वारे सर्वसमावेशक आरोग्य सेवा प्रदान करते. | इएसआयसी (कर्मचारी राज्य विमा निगम) ही अंमलबजावणी करणारी संस्था आहे | रु. 15000 पर्यंत वेतन मिळवणारे सर्व कामगार याअंशदान योजनेंतर्गत समाविष्ट आहेत | कर्मचारी आणि नियोक्ता वेतनापैकी अनुक्रमे 1.75% आणि 4.75% योगदान देतात; वैद्यकीय खर्चात राज्य सरकार 12.5% योगदान देते | 1 |
| 97 | केंद्र सरकारच्या आरोग्य योजनेशी संबंधित खाली दिलेली सर्व विधाने _______ वगळून सत्य आहेत. | केंद्र सरकारची आरोग्य योजना (सीजीएचएस), जी 1954 मध्ये सुरू झाली | सीजीएचएस केवळ केंद्र सरकारच्या कर्मचाऱ्यांसाठी आहे ज्यात निवृत्तीवेतनधारक आणि त्यांच्या कुटुंबातील सदस्य जे नागरी नोकऱ्यांमध्ये काम करतात | कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबियांना सर्वसमावेशक वैद्यकीय सेवा प्रदान करणे हे त्याचे उद्दिष्ट आहे आणि नियोक्ता (केंद्र सरकार) द्वारे पूर्णपणे निधी दिला जातो. | या सेवा सीजीएचएस च्या स्वतःच्या दवाखान्यातून, पॉलीक्लिनिक्स आणि पॅनेल केलेल्या खाजगी रुग्णालयांद्वारे पुरवल्या जातात. | 3 |
| 98 | खाली दिलेले सर्व पर्याय __________ वगळून हे जीवनशैलीचे घटक आहेत जे कोणत्याही व्यक्तीचे आरोग्य ठरवतात. | व्यायाम करणे | मर्यादेत खाणे | सुरक्षित पिण्याचे पाणी | चिंता टाळणे | 3 |

| Sr. No. | Question Body_Marathi | Alternative 1_Marathi | Alternative 2_Marathi | Alternative 3_Marathi | Alternative 4_Marathi | Correct Alternatives position |
|---|---|---|---|---|---|---|
| 99 | अस्वच्छतेसारख्या पर्यावरणीय घटकांमुळे होणाऱ्या संसर्गजन्य रोगाचे उदाहरण खालीलपैकी कोणते आहे? | इन्फ्लुएंझा | मलेरिया | डेंग्यू | ऍस्बेस्टोसिस | 1 |
| 100 | अस्वच्छतेसारख्या पर्यावरणीय घटकांमुळे होणाऱ्या संसर्गजन्य रोगाचे उदाहरण खालीलपैकी कोणते आहे? | कांजिण्या | मलेरिया | डेंग्यू | ऍस्बेस्टोसिस | 1 |
| 101 | खरे विधान ओळखा<br>I. गंभीर आजार पॉलिसी सामान्यतः 21 वर्षे ते 65 वर्षे वयोगटातील व्यक्तींसाठी उपलब्ध असतात.<br>II. या पॉलिसी अंतर्गत देऊ केलेली विम्याची रक्कम खूपच कमी असते. | फक्त I सत्य आहे | फक्त II सत्य आहे | I आणि II दोन्ही सत्य आहेत | I आणि II दोन्ही असत्य आहेत | 1 |
| 102 | खालीलपैकी कोणते एकत्रित (पॅकेज) पॉलिसीचे उदाहरण आहे?<br>I. आरोग्य आणि जीवन संयुक्त (हेल्थ प्लस लाइफ कॉम्बी) योजना<br>II. दुकानदार विमा योजना<br>III. गृहस्थ विमा योजना | फक्त I | I आणि II | II आणि III | I, II आणि III | 3 |

| Insurance Agents (Life) Question Bank - Marathi | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Question Body_Marathi | Alternative 1_Marathi | Alternative 2_Marathi | Alternative 3_Marathi | Alternative 4_Marathi | Correct Alternatives position |
| 103 | आरोग्य विमा पॉलिसीच्या बाबतीत (हेल्थ इन्शुरन्स पॉलिसी) फ्री लूक (पुनर्विचाराचा कालावधी) काय आहे? | 15 दिवस | 20 दिवस | 30 दिवस | 45 दिवस | 1 |
| 104 | एका आयुर्विमा कंपनीने, पॉलिसी-मुदतीच्या दरम्यान, विमा-कृत व्यक्तीच्या रुग्णालय-भर्तीच्या घटनेमध्ये, विमा-कृत व्यक्तीला, उपचाराचा खर्च दिलेला आहे. हे --- चे एक उदाहरण आहे. | विद्यमानता-लाभ | अभ्यर्पण-मूल्य | ऐच्छिक आणि अतिरिक्त लाभ (रायडर) | सशर्त अभिहस्तांकन | 3 |

| Insurance Agents (Life) Question Bank - Marathi | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Question Body_Marathi | Alternative 1_Marathi | Alternative 2_Marathi | Alternative 3_Marathi | Alternative 4_Marathi | Correct Alternatives position |
| 105 | श्रीमती कविता यांनी, ए.बी.सी. विमा कंपनीकडून, मुदतीच्या विमा योजनेसहित, एक गंभीर आजार (सी.आय.) ऐच्छिक आणि अतिरिक्त लाभ (रायडर) खरेदी केलेला आहे. कंपनी, गंभीर आजार (सी.आय.) ऐच्छिक आणि अतिरिक्त लाभ (रायडर) दाव्याची खातरजमा कशा प्रकारे करेल? सर्वाधिक योग्य पर्याय निवडा. | पॉलिसीमध्ये विहित केलेल्या, अटींनुसार, विमा-दाव्याची खातरजमा केली जाईल. | विमा-दाव्याची खातरजमा, तारखांच्या आधारे, ज्या, कराराच्या सुरुवातीलाच निश्चित केलेल्या असतात, केली जाईल. | विमा-दावा केला जाईल, जेंव्हा, पॉलिसी-धारक, करार रद्द करण्याचा निर्णय घेतील. | पॉलिसी-धारकांनी, त्यांच्या दाव्याच्या समर्थनार्थ दिलेल्या, वैद्यकीय व इतर नोंदींच्या आधारे, दावे निश्चित केले जातील. | 4 |
| 106 | एबीसी विमा कंपनी त्यांच्या प्रिमियम गणनेमध्ये उच्च व्याज दर गृहीत धरते. याचा अर्थ असा कीः | प्रिमियम जास्त आकारला जाईल | प्रिमियम कमी आकारला जाईल | आकारलेले प्रिमियम कायम स्थिर रहातील | आकारल्या जाणाऱ्या प्रिमियममध्ये मोठ्या प्रमाणात चढ-उतार होईल | 2 |

| Insurance Agents (Life) Question Bank - Marathi | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Question Body_Marathi | Alternative 1_Marathi | Alternative 2_Marathi | Alternative 3_Marathi | Alternative 4_Marathi | Correct Alternatives position |
| 107 | खरे विधान ओळखा<br>I. आरोग्य आणि जीवन संयुक्त (हेल्थ प्लस लाइफ कॉम्बी) योजना दोन विमाकर्त्यांनी संयुक्तपणे तयार केली आहे आणि दोन्ही विमाकर्त्यांच्या वितरण वाहिन्यांद्वारे त्याची विक्री केली जात आहे.<br>II. हेल्थ प्लस लाइफ कॉम्बी योजनेसाठीचे दावे, विमाकर्त्यांद्वारे संयुक्तपणे हाताळले जातात | फक्त I सत्य आहे | फक्त II सत्य आहे | I आणि II दोन्ही सत्य आहेत | I आणि II दोन्ही असत्य आहेत | 1 |
| 108 | हृदयविकाराचा झटका, स्ट्रोक, कर्करोग इ. पूर्वी ठरवलेले गंभीर आजार झाल्यास भरपाई देण्यासाठी खालीलपैकी कोणती आरोग्य विमा उत्पादने, या निश्चित लाभ योजना देतात? | नुकसानभरपाईचे संरक्षण | निश्चित लाभाचे कवच | गंभीर आजारापासून संरक्षण | वरील सर्व | 3 |

| Insurance Agents (Life) Question Bank - Marathi | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Question Body_Marathi | Alternative 1_Marathi | Alternative 2_Marathi | Alternative 3_Marathi | Alternative 4_Marathi | Correct Alternatives position |
| 109 | गंभीर आजारापासून संरक्षण ('क्रिटिकल इलनेस कव्हर') अंतर्गत कोणते लाभ दिले जातात? | रुग्णालयात दाखल केल्यामुळे झालेला वास्तविक वैद्यकीय खर्च | रूग्णालयातील वास्तव्याच्या कालावधीसाठी दररोज एक निश्चित रक्कम | हृदयविकाराचा झटका, स्ट्रोक, कर्करोग इ. सारख्या पूर्वी निश्चित केलेल्या गंभीर आजाराच्या घटनेवर पैसे देणे | वरील सर्व | 3 |
| 110 | रूग्णालयातील दैनंदिन रोख रक्कम पॉलिसी खालील फायदे प्रदान करते:<br>I. अनुषंगिक खर्च<br>II. नुकसानभरपाई पॉलिसी अंतर्गत देय नसणारे खर्च<br>III. विमाधारकाने देण्याच्या रकमेच्या (को-पे) अंतर्गत देय नसलेले खर्च | फक्त I | I आणि II | II आणि III | I, II आणि III | 2 |
| 111 | खालील दिलेल्या वयाच्या पुराव्याच्या दस्तऐवजांवरून, विमा कंपन्यांद्वारे अप्रमाणित म्हणून वर्गीकृत केलेला पुरावा ओळखा. | शाळेचे प्रमाणपत्र | सैन्यातील कर्मचाऱ्यांचे ओळखपत्र | शिधापत्रिका | बाप्तिस्म्याचे प्रमाणपत्र | 3 |

| Insurance Agents (Life) Question Bank - Marathi | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Question Body_Marathi | Alternative 1_Marathi | Alternative 2_Marathi | Alternative 3_Marathi | Alternative 4_Marathi | Correct Alternatives position |
| 112 | खालील विमालेखन पद्धतींपैकी ___________ वगळून विमालेखनाची प्रक्रिया वेगवान आहे परंतु प्रिमियम जास्त असू शकतात | वैद्यकीय विमालेखन | नॉन मेडिकल विमालेखन | संख्यात्मक रेटिंग पद्धत | समूह विमा | 1 |
| 113 | समूह विमा, प्रामुख्याने _______________ वर विमालेखित केला जातो. | परम सद्‌भाव कायदा | विमा हित कायदा | सरासरीचा कायदा | परस्पर फायद्याचा कायदा | 3 |
| 114 | गंभीर आजार (सी.आय.) ऐच्छिक आणि अतिरिक्त लाभ (रायडर) याच्या संदर्भात, खालील विधानांपैकी कोणते एक, चूक आहे? सर्वाधिक योग्य पर्याय निवडा. | एखाद्या गंभीर आजाराचे निदान झाल्यास, पॉलिसी-अटींच्या अनुसार, एक विशिष्ट रक्कम दिली जाते. | विमा कंपनीने निर्दिष्ट केलेल्या, गंभीर आजारांच्या यादीत अंतर्भूत असलेला, आजार असावयास हवा. | गंभीर आजार (सी.आय.) ऐच्छिक आणि अतिरिक्त लाभ (रायडर) हे अशा विमा-दाव्यांचे एक उदाहरण आहे, जे, पॉलिसी-कालावधीत होऊ शकतात. | ऐच्छिक आणि अतिरिक्त लाभ (रायडर) याची रक्कम अदा केल्यानंतर, आयुर्विमा पॉलिसी करार रद्द होतो. | 4 |
| 115 | तृतीय-पक्ष प्रशासक (टी.पी.ए.), खालीलपैकी कोणती संस्थेद्वारा विनियमित केले जातात? | जीवन विमा परिषद आणि साधारण विमा परिषद, संयुक्तपणे. | भारतीय विमा नियामक आणि विकास प्राधिकरण (आय.आर.डी.ए.आय.) | भारतीय विमा दलाल संघटना | अर्थ मंत्रालय | 2 |

| Insurance Agents (Life) Question Bank - Marathi | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Question Body_Marathi | Alternative 1_Marathi | Alternative 2_Marathi | Alternative 3_Marathi | Alternative 4_Marathi | Correct Alternatives position |
| 116 | दाव्याच्या प्रक्रियेसाठी, खालीलपैकी कोणते दस्तऐवज सर्वात महत्वाचे आहेत?<br>I. आजारपणाचा कागदोपत्री पुरावा<br>II. हॉस्पिटलला पैसे भरल्याचा तपशील<br>III. उपचारासाठी पुढील सल्ला<br>IV. इम्प्लांटसाठी पैसे दिल्याचे पुरावे | फक्त I आणि II | फक्त I आणि IV | I, II आणि III | I, II, III आणि IV | 3 |

# Insurance Agents (Life) Question Bank - Marathi

| Sr. No. | Question Body_Marathi | Alternative 1_Marathi | Alternative 2_Marathi | Alternative 3_Marathi | Alternative 4_Marathi | Correct Alternatives position |
|---|---|---|---|---|---|---|
| 117 | टीपीए द्वारे देण्यात येणाऱ्या दावा प्रक्रिया आणि पैसे देण्याच्या सेवेसंदर्भात खालीलपैकी कोणते विधान/विधाने बरोबर आहे/आहेत? I. टीपीए सामान्यतः दाव्याच्या निपटाऱ्याकरिता विमा कंपनीकडून आगाऊ पैसे घेतात. टीपीए ने पैशांचा हिशेब ठेवणे आणि विमा कंपनीकडून प्राप्त झालेल्या रकमेचा वेळोवेळी हिशोब देणे अपेक्षित आहे. II. मंजूर दाव्यांच्या पेमेंटसाठी आणि ग्राहकांना इतर सेवा प्रदान करण्यासाठी पैसे वापरले जाऊ शकतात | फक्त I | फक्त II | I आणि II दोन्ही | I किंवा II नाही | 1 |
| 118 | एका विमा कंपनीला रुग्णालय-भर्ती-सूचना, खालील पैकी कोणत्या मार्गाने, दिली जाऊ शकते? | फॅक्स | संपर्क-केंद्राला संपर्क करणे | ई-मेल | वरील पैकी कोणतेही. | 4 |

| Insurance Agents (Life) Question Bank - Marathi | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Question Body_Marathi | Alternative 1_Marathi | Alternative 2_Marathi | Alternative 3_Marathi | Alternative 4_Marathi | Correct Alternatives position |
| 119 | एका आरोग्य विमा दावा प्रक्रिया करण्याकरिता, खालील पैकी कोणते, सर्वाधिक महत्वाचे दस्तऐवज असतात?<br>I. आजारी असल्याचा दस्तावेजी पुरावा.<br>II. केलेले उपचार.<br>III. अंतर्गत-रुग्ण कालावधी.<br>IV. रोगनिदान-अन्वेषण-अहवाल. | केवळ, I आणि II. | केवळ, I आणि IV. | I, II, आणि IV. | I, II, III, आणि IV. | 4 |
| 120 | बरोबर विधान ओळखा:<br>I. अती-वजनदार असणे किंवा कमी-वजनदार असणे, कांही पूर्वीचे आणि कांही सध्याचे आजार किंवा व्याधी यांचा व्यक्तिगत इतिहास, अशा विविध प्रतिकूल घटकांमुळे रुग्णता वाढते.<br>II. कमी वय, एक आरोग्यपूर्ण जीवन-शैली, इत्यादींसारख्या अनुकुल घटकांमुळे रुग्णता कमी होते. | केवळ विधान-I बरोबर आहे. | केवळ विधान-II बरोबर आहे. | विधान-I आणि विधान-II, दोनही, बरोबर आहेत. | विधान-I आणि विधान-II, दोनही, चूक आहेत. | 3 |